# शेतकऱ्यांसाठी मोबाईल ॲप

पुणे : शेतीमधील फळे, भाज्या, डाळींची उपलब्धता, किंमत व सद्यःस्थितीविषयी अद्ययावत माहिती देणारे farmersorg.in हे मोबाईल ॲप माय विश्व टेक्नॉलॉजी या कंपनीने विकसित केले आहे. या ॲपमुळे शेतकऱ्यांचा वेळ व खर्चात बचत, मालाला योग्य दर मिळण्याबरोबर मानसिक त्रासही कमी होणार आहे. माय विश्व टेक्नॉलॉजीतर्फे या ॲपचे पत्रकार परिषदेत अनावरण करण्यात आले. या वेळी अभिनेते नाना पाटेकर, माय विश्वचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, संचालिका सुप्रिया लिमये, शेखर डिंबळे आदी उपस्थित होते.